# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

# दिनांक २१/११/२०२० (शनिवार)

---

## घरफोडी

१)पोस्टे कळमेश्वर :– अंतर्गत ०९ किमी अंतरावर मौजा फेटरी येथील धनंजय मनोहरराव अरमरकर वय ४३ वर्षे यांचे फिर्यादीवरून १६.११.२०२० चे १३.०० वा ते २०.११.२०२० चे १७ .३० वा दरम्यान फिर्यादी हे नातेवाइकोणीतरी अज्ञात चोरांनी घराचे समोरील दरवाजाचे कुलुप तोडून घरात प्रवेश केला आणि घरातील कपाटाचे लॉकरमध्ये ठेवलेले १) सोन्याच्या बांगडया १८ ग्रॅम कि. २७,०००.रू, २) २ग्रॅमचा सोन्याच्या गोप कि.३,०००.रू, ३) १ ग्रॅमचा सोन्याची नथ कि. १५००रू ४) सोन्याचे डोरले २ ग्रॅम कि ३००० रू असा एकुण ३४,५००रू चा माल चोरून नेल्याचे फिर्यादिच्या तोंडी रिपोर्टवरून अज्ञात आरोपीविरूध्द पोलीस ठाणे कळमेश्वर येथे कलम ४५७, ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक श्री. ईश्वर धुर्व हे करीत आहे.

## चोरी

१)पोस्टे उमरेड :– अंतर्गत मौजा वायगाव घाटुर्ली येथील फिर्यादी नामे प्रतपालसिंग प्रीतमसींग सैनी वय ५२ वर्षे यांचे घराचे गेटसमोर ठेवलेली ॲक्टीवा गाडी क्र. एम. एच. ४०/ बीडी ९२१५ कि. ३५,०००/– रू. ची दिनांक २०/११/२०२० चे १५/३० वा ते १६/०५ दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेली.

सदर फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोस्टे उमरेड येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. प्रफुल माहुरे हे करीत आहेत.

## अज्ञात पुरुषाचा मृतदेह आढळला

१) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत मौजा कळमणा गाावाजवळ दिनांक २१/११/२०२० रोजी ११.०० वा. चे सुमारास पांढराबोडी तलावात अंदाजे ३५ वर्षे वयाच्या पुरुषाचा मृतदेह पाण्यात तरंगतांना मिळून आला. सदर इसमाची उंची अंदाजे ६ फुट असुन मजबुत बांधा, रंग सावळा, उजव्या हाताच्या मनगटावर एका बाजुस ओम चे चिन्ह व दुसऱ्या बाजुर त्रिशुळाचे चिन्ह गोंदविलेले आहे. अंगात बिगर बाहीचे राखडी रंगाचे बनियान व कमरेत काळ्या रंगाची हाफ पॅन्ट घातलेला आहे. नमुद

वर्णनाच्या इसमाबाबत माहिती असल्यास पोलीस ठाणे उमरेड येथे दुरध्वणी क्र. ०७१०६२४२००३, ९८६७११२१८५, ९४२३६००५५६ यावर संपर्क साधावा.

## विनयभंग

१) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत आरोपीने अल्पवयीन फिर्यादी मुलीस वारंवार फोन करुन आणि पाठलाग करुन तु माझेशी लग्न कर असे म्हणुन दिनांक १९/११/२०२० चे १७.०० वा. फिर्यादी मुलगी बाजारात चप्पल घेण्याकरिता गेली असता तिचा पाठलाग करुन विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी विरूध्द कलम ३५४ (ड) भादंवि सहकलम ११, १२ पोक्सो २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद करुन आरोपी राकेश शत्रुघ्न शाहु, वय २२ वर्षे, रा. कळमेश्वर यास अटक करण्यात आली. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री कर्मलवार हे करीत आहे.

## निष्काळजीपणे भरधाव वेगाने वाहन चालवुन मरणास कारणीभुत

१) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ०८ किमी अंतरावर सावनेर पांढुर्णा बायपास रोडने दिनांक १४/११/२०२० चे १४.०० वा. दरम्यान यातील मृतक नामे रवी अंतराम आहाके, रा. खरे वार्ड, पाढुर्णा याने मित्र नामे दिपक धुर्वे यास आपले दुचाकी वाहन क्र एम. पी. २८/एन २८३२ वर डबलसिट बसवुन सावनेर ते पांढुर्णा रोडने आपले वाहण भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोड डिव्हायडरला धडक मारुन जखमी झाले. त्यांना मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर केले असता डॉक्टरांनी वाहण चालक रवी अंतराम आहाके यास तपासुन मृत घोषीत केले.

सदरहु वाहन चालक आपले स्वत: चे मरनास कारणीभुत ठरल्याने सदर प्रकरणी शासन तर्फे फिर्यादी पोलीस हवालदार विकास बेलसरे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपी मृतक वाहण चालकाविरुद्ध कलम २७९, ३०४ (अ) भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक श्री. पाटील हे करीत आहेत.

२) पो.स्टे. एम. आय. डी. सी. (बुटीबोरी) :– अंतर्गत ०२ किमी अंतरावर केईसी कंपनीजवळ दिनांक ११/११/२०२० चे १४.०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे रितीक सदाशिव दाभेकर, वय २० वर्षे, रा. टाकळघाट याने मित्र नामे प्रनय योगेश जीचकार, वय १९ वर्षे रा. म्हाडा कॉलोनी, बुटीबोरी यास आपले बजाज पल्सर दुचाकी वाहन क्र एम. एच. ४०/बी. व्ही. ३६४१ वर डबलसिट बसवुन केईसी कंपनीकडुन इंडोरामा कंपनीकडे जातांना आपले वाहण भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रस्त्यात कुत्रा आडवा आल्याने वाहण अनियंत्रित होवुन दोघेही खली पडुन जखमी झाले. त्यांना उपचाराकरिता ऑरेंजसिटी हॉस्पीटल, नागपुर येथे भरती केले असता उपचारादरम्यान प्रनय योगेश जीचकार मरण पावला.

सदरहु वाहन चालक त्याचा मित्र प्रनय योगेश जीचकार याचे मरणास कारणीभुत ठरल्याने सदर प्रकरणी शासन तर्फे फिर्यादी पोलीस हवालदार रमेश कनेरे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. एम. आय. डी. सी. (बुटीबोरी) येथे आरोपी वाहण चालकाविरुद्ध कलम २७९, ३०४ (अ) भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. अशोक तलमले हे करीत आहे

३) पो.स्टे. बुटीबोरी :— अंतर्गत १८ किमी अंतरावरील मौजा जांभळापाणी शिवारात दिनांक १९/११/२०२० चे २०.०० वा. दरम्यान यातील आरोपी वाहणचालक नामे प्रदिप मधुकर मैद, वय ३५ वर्षे, रा. वडधामणा, ता. हिंगणा याने त्याची आई नामे कमलाबाई मैद हिला आपले दुचाकी वाहन क्र एमएच ३१ बीके ८२७३ वर डबलसिट बसवुन आपले वाहण भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वाहण अनियंत्रित होवुन रस्त्यावरील खड्ड्यात उसळल्याने आरोपीची आई कमलाबाई मैद ही गंभीर जखमी होवुन मरण पावली.

सदरहु वाहन चालक त्याची आई कमलाबाई मैद हिवे मरणास कारणीभुत ठरल्याने सदर प्रकरणी फिर्यादी विठ्ठल जगन पारकडकर, वय ५१ वर्षे, रा. सालई गोधणी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बुटीबोरी येथे आरोपी वाहण चालकाविरुद्ध कलम २७९, ३०४ (अ) भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री. चौधरी हे करीत आहेत.

## प्राण्यांची निर्दयतेने कोंबुन वाहतुक

१) पो.स्टे. उमरेड :—

(१) अंतर्गत ०७ किमी अंतरावर मांगरुळ फाट्याजवळ दिनांक २०/११/२०२० चे ०२.०० वा ते ०२.३० वा. नाकाबंदी दरम्यान आरोपी क्र. १) सुरेश सत्याभान वाघमारे वय ३५ वर्षे रा. भिवापुर २) अमित बंडु मेश्राम वय २५ वर्षे रा. कोटगाव ता. नागभिड जि. चंद्रपुर ३) ईसराइल कुरेशी वय ४२ वर्ष रा. नागपुर हे आपले ताब्यातील महिद्रा पिकअप बोलेरो गाडी क्र एम एच ४० बी एल ८५५४ मध्ये एकुण ११ गोवंशीय प्राण्यांना आपले वाहणात कोंडुन क्रुर व निर्दयतेने त्याचे तोंड सिंग, मान व पाय दोराने बांधुन एकावर एक रचुन अवैध वाहतुक करतांना करतांना मिळुन आल्याने त्यांचेकडुन वाहणासह एकुण ७,३३,०००/— रु. चा माल हस्तगत करुन शासन तर्फे पोलीस नाईक राहुल धेंडे यांचे फिर्यादीवरुन त्यांचेविरुद्ध पोलीस ठाणे उमरेड येथे अप. क्र. ७५५/२०२० कलम ११(१)(ड)(घ)(च) प्राण्याचा छळ प्रतिबंध अधि.१९६० सहकलम ५ (अ)(ए)(१) महा प्राणी संरक्षण अधि. सहकलम ११९ मपोका १८४, १३० मोवाका सहकलम १०९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार श्री चारुदत्त बोरसरे हे करित आहेत.

(२) अंतर्गत ०७ किमी अंतरावर मांगरुळ फाट्याजवळ दिनांक २०/११/२०२० चे ०२.०० वा ते ०३.४० वा. नाकाबंदी दरम्यान आरोपी क्र. १) आवेश इसाद पठाण वय

२४ वर्षे रा. शिवनगर नागभिग जि. चंद्रपुर २) आवेश इब्राइम कुरेशी वय २३ वर्षे रा. बेसुन ता उमरेड ३) ईरफान इसराइल शेक्ष वय ३५ वर्ष रा. सिर्सी ता. उमरेड हे आपले ताब्यातील **महिद्रा पिकअप बोलोरो गाडी क्र एम एच ४० डी ६४९१**_मध्ये एकुण ०९ गोवंशीय **प्राण्यांना (गाय) आपले वाहणात कोंडुन क्रुर व निर्दयतेने त्याचे तोंड सिंग, मान व पाय दोराने बांधुन एकावर एक रचुन अवैध वाहतुक करतांना करतांना मिळुन आल्याने त्यांचेकडुन वाहणासह एकुण ७,२७,०००/— रु. चा माल हस्तगत करुन शासन तर्फे पोलीस शिपाई अमोल मांढरे यांचे फिर्यादीवरुन त्यांचेविरुद्ध पोलीस ठाणे उमरेड येथे अप. क्र. ७५६/२०२० कलम ११(१)(ड)(घ)(च) प्राण्याचा छळ प्रतिबंध अधि.१९६० सहकलम ५ (अ)(ए)(१) महा. प्राणी संरक्षण अधि. सहकलम ११९ मपोका १८४, १३० मोवाका सहकलम १०९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस नाईक श्री राहुल धोंडे हे करित आहेत.**

## अज्ञात इसमाचा मृ

१) पो.स्टे. उमरेड :—

**(१) अंतर्गत ०७ किमी अंतरावर मांगरुळ फाट्याजवळ दिनांक २०/१**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर.